# शाळेचे दिवस

vejsõÛdeuleeÖej

बराच काळ बंद असलेल्या एखाद्या खोलीची सर्व खिडक्यादारे एकदम उघडावीत आणि स्वच्छ हवा- प्रकाशाने खोली भरून जावी तसे आमचे झाले होते. माणसाच्या स्वाभाविक जीवनप्रेरणाच दडपून टाकणारी राजवट संपली होती. समाजजीवन मुक्त श्वास घेऊ लागले होते. मागील काही आठवड्यात गोठून गेलेली गावाची हालचाल पुन: सुरू झाली होती. संस्थानातल्या इतर सर्व तुरुंगातले राजबंदी सुटले होते, फक्त औरंगाबादच्या हर्सूल जेलमधील कार्यकर्ते मात्र अद्याप सुटले नव्हते. औरंगाबाद जिल्ह्याचे प्रशासक म्हणून राजवाडे नावाचे एक अधिकारी आले होते. त्यांच्यावरील ब्रिटिश शासनाचे संस्कार अद्याप पुसले गेले नव्हते. तुरुंगातले राजकीय कैदी कोणते व इतर गुन्हेगार कैदी कोणते याची शहानिशा करण्याला त्यांना वेळच झाला नव्हता. जुलमी सत्ता संपते तेव्हा त्या सत्तेविरुद्ध संघर्ष करणारे बंदी मुक्त करणे हा स्वातंत्र्याचा पहिला अविष्कार असतो हे त्यांना माहीत नसावे. संस्थान मुक्त होताच सरहद्दीबाहेर जाऊन राहिलेले कार्यकर्ते परत आले व त्यांचे लोकांनी स्वागतही केले. त्यातल्या एक-दोघांनी आपल्याला नसलेले अधिकार वापरून रझाकारकाळात झालेल्या गुन्ह्यांची चौकशी करावयास सुरुवातही केली होती. हर्सूल तुरुंगात असलेले माझे वडील-काका मात्र अजून सुटावयाचे होते.

काका आज सुटणार, उद्या सुटणार अशा काही अंदाजवजा बातम्या आल्या की आमची उत्सुकता वाढू लागे. मी आणि माझे दोन-तीन मित्र माळीवेस मारुतीच्या देवळातली काटेकोरांटीची, स्टेट बँकेच्या आवारातली सदाफुलीची आणि शेवंतीची, दत्त मंदिरातली जाई आणि चाफ्याची फुले तोडून आणून त्याचे छोटे हार करून काकांच्या स्वागताची तयारी करत असू. दोन-तीन वेळा आमची निराशा झाली. शेवटी पोलिस कारवाईला १३-१४ दिवस झाल्यानंतर एके दिवशी काका आणि औरंगाबाद तुरुंगातले इतर कार्यकर्ते सुटले. ते सगळे बसस्टॅण्डवर पोहोचल्यावर कोणी तरी वाड्यात निरोप केला. माझे चुलते बाबा मला आणि माझ्या धाकट्या बहिणीला-उषाला तेथे घेऊन गेले. पोस्टाच्या बाजूच्या मोकळ्या जागेत लोकांची गर्दी झाली होती. काका दिसताच आम्ही धावतच त्यांना जाऊन बिलगलो. उषा चार- पाच वर्षांची होती. काका थोडे दिवस घरी असतात आणि पुन: पोलिस त्यांना तुरुंगात घेऊन जातात हे तिला माहीत होते. आताही तसेच होईल असे तिला वाटले. 'आता पुन: तुम्ही केव्हा जेलमध्ये जाणार?' असा प्रश्न तिने विचारला तेव्हा काकांनी हसून तिला उचलून घेतले. काका वाड्यात आले तेव्हा आईने भाकरीचा तुकडा ओवाळून टाकला, आजीने काकांना जवळ घेतले आणि दोघींच्याही डोळ्यात पाणी आले. हळूहळू लोक भेटावयास येऊ लागले आणि वाडा पुन्हा गजबजून गेला.

नवे शासन हळूहळू स्थिर होत होते. पिंपुटकर नावाचे एक कर्तव्यदक्ष व कडक सनदी अधिकारी काही दिवसांनी बीडला प्रशासक म्हणून रुजू झाले. निजामी राजवटीच्या शेवटच्या काळातल्या गैरप्रकारांची चौकशी सुरू झाली. जवळजवळ सर्वच रझाकार पुढारी व त्यांचे साथीदार, काही घाबरलेले मुस्लिम अधिकारी हैदराबादकडे पळून गेले होते. त्या राजवटीला अनुकूल असणाऱ्या किंवा सरकारी गोटाशी स्नेहसंबंध राखणाऱ्या दोन-चार हिंदू प्रतिष्ठितांना मात्र चौकशीसाठी थोडे दिवस पोलिस ठाण्यात किंवा तुरुंगात राहावे लागले. त्यातल्या एक-दोघांना तर नगरला पाठवण्यात आले होते.

पोलिस कारवाईपासून बंद असलेली आमची शाळा कधी सुरू होणार याची वाट आम्ही पाहत होतो. पोलिस कारवाईला पाच-सात दिवस होऊन गेले होते. शाळा आता सुरू होणार असे कोणीतरी सांगितले. कानोकानी आलेल्या या बातमीनंतर एका शनिवारी आम्ही शाळेत पोहोचलो. शुक्रवारी संस्थानात सुटी असे. शनिवार हा आठवड्याचा पहिला दिवस. शिक्षकांपैकी काही आले होते. आमचे हेडमास्तर जुल्फेकार अली हैदराबादला पळून गेले होते ते मात्र परत आलेच नाहीत. पहिल्याच दिवशी मुले शाळेच्या मैदानावर प्रार्थनेसाठी जमली तेव्हा झालेल्या बदलाची जाणीव झाली. पूर्वी निजामाचे क्षेमकुशल चिंतणारी प्रार्थना आम्ही म्हणत होतो; ती न म्हणता मराठवाड्यातील खासगी शाळात म्हटली जाणारी 'हे प्रभो आनंददाता, ज्ञान हमको दिजिये । शीघ्र सारे दुर्गुणोको, दूर हमसे किजीये' ही प्रार्थना आम्ही म्हटली. उर्दू माध्यम बदलून मराठी होण्याला, अभ्यासक्रम बदलण्याला, नवी पुस्तके येण्याला नवे वर्ष उजाडावे लागणार होते; पण वर्गात मराठीचा मुक्त वापर लगेच सुरू झाला. हिंदू शिक्षक आपला विषय मराठीतही समजावून सांगू लागले. भूगोल शिकवणारे गुलाम महमंद आणि उर्दूचे फैजी अशा काही शिक्षकांना मराठी येत नव्हते. त्यांना मात्र उर्दूशिवाय पर्याय नव्हता. परीक्षा मार्चमध्ये होणार होत्या. पाच-सहा महिनेच राहिले होते. आमची सहावीची परीक्षा त्यावर्षी फारशा गंभीरपणे झालीच नाही. जुजबी परीक्षेनंतर आम्ही

सगळे पास झालो.

शाळेत एक नवेच मोकळे वातावरण निर्माण झाले होते. शाळेला मोठे मैदान होते. मैदानी खेळात सामान्यत: मुस्लिम मुलेच असत. ते चित्र बदलून सगळीच मुले हॉकी, फुटबॉल खेळू लागली. शाळेत एक वादविवाद मंडळ सुरू झाले व सर्व शाळेच्या उपस्थितीत वादविवाद स्पर्धा होऊ लागल्या. वासुदेवराव गुरुजींचा त्यात पुढाकार होता. वक्तृत्वाविषयी वासुदेवरावांच्या कल्पना फारच नावीन्यपूर्ण होत्या. 'विभूती श्रेष्ठ की परिस्थिती' असा विषय त्यांनी एकदा दिला होता. विभूती श्रेष्ठ म्हणणाऱ्या मुलांनी त्यांनी विभूती शब्दाचा उच्चार कसा जोरकस करावा आणि परिस्थिती हा शब्द हवा जात असलेल्या फुग्यासारखा उतरत्या भाजणीने कसा उच्चारावा याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. परिस्थिती श्रेष्ठ म्हणणारांना त्यांनी परिस्थिती शब्दाचा उच्चार कसा परिणामकारक करता येईल व विभूती हा शब्द शक्यतो तुच्छतेने कसा उच्चारता येईल याचेही प्रात्यक्षिक दाखवले. वक्तृत्वात वाचिक अभिनयाचा मोठा भाग असतो असा त्यांचा विश्वास होता.

शाळेच्या सगळ्याच कार्यक्रमात हिंदू मुलेही मोकळेपणाने भाग घेऊ लागली. मुस्लिम मुलांच्या मनात प्रारंभी प्रतिक्रियेची भीती होती; पण ती हळूहळू निवळली. शाळेचे समारंभ कधी काका तर कधी काँग्रेसमधील त्यांचे दुसरे कोणी सहकारी यांना बोलावून होऊ लागले. दोन-अडीच महिने गेल्यावर हैदराबाद मुक्त करणाऱ्या सेनेचे प्रमुख आणि संस्थानाचे लष्करी प्रशासक मेजर जनरल जयंतीनाथ चौधरी बीडला आले. आमच्या शाळेच्या मैदानावर झालेल्या प्रचंड मोठ्या सभेत त्यांचा सत्कार करण्यात आला. चौधरींना हार घालण्याचा मी हट्ट धरला होता. सभेचे संचलन काकांचे एक सहकारी रतनलालजी करीत होते. मला हार घालण्याची परवानगी देणे पुढाऱ्यांच्या मुलाला प्राधान्य देण्याचा पायंडा पाडणारे ठरले असते. शेवटी त्यांनी 'विद्यार्थी नाना' एवढेच नाव जाहीर करून मला हार घालू दिला.

पोलिस कारवाईनंतर गावाच्या दृश्यस्वरूपात फार बदल झाले नाहीत तरी आंतरिक बदल मोठा होता. गावात मुस्लिम आणि हिंदू वस्त्या पूर्वीपासूनच सामान्यत: वेगवेगळ्या असल्या तरी हिंदू वस्तीत मुस्लिमांची पुष्कळ दुकाने होती. त्यांचे ग्राहक मुख्यत: हिंदूच होते. काही व्यावसायिकांनी तर दुसऱ्यांच्या संस्कृतीशी नाते जोडले होते. आमच्या वाड्याजवळच एक मण्यार कुटुंब राहत होते. लग्नकार्यात बांगड्या भरण्यासाठी मण्याराच्या बुबू यायच्या. सवाष्णबाईने बांगड्या भरल्यानंतर रीतीप्रमाणे ती बुबूला खाली वाकून नमस्कार करी आणि बुबू तिला 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा स्वच्छ उच्चारात आशीर्वाद देत. पोलिस कारवाईच्या रात्री झालेल्या लुटालुटीत बुबूंच्या दुकानाला काहीच झाले नव्हते. नंतरच्या काळात मुस्लिमांची बहुतेक दुकाने मुस्लिम वस्तीतच गेली. अपवाद फक्त मण्याराच्या बुबू आणि हॉटेले व पानवाले यांचा. ती जुन्याच जागेत राहिली. हॉटेलच्या व्यवसायात प्रथमच एका बाईने अंताजी मशिदीच्या बाजूला एक हॉटेल उघडले. बाईने हॉटेल चालवावे हे तर अप्रूप होतेच; शिवाय दुसरे म्हणजे तेथे ग्रामोफोन होता व त्यात चक्क मराठी गाणी लावली जायची. पोलिस कारवाई नुकतीच झाली होती आणि 'हैदराबादचा पोवाडा' नावाची एक रेकॉर्ड कोंडाबाई नेहमी लावावयाच्या. बहुधा पिराजी सरनाईकांनी गायिलेल्या या पोवाड्यात रझाकारांच्या धुमाकुळीचे वर्णन होते. त्यातल्या काही ओळी अजून माझ्या स्मरणात आहेत.

'खर्डाखर्डी झाली फक्त सामीलनाम्याची
जणू लढाई खर्ड्यांची
रझाकाराच्या अमदानीत'

काही महत्त्वाच्या शासकीय पदावर संस्थानाबाहेरचे अधिकारी पाठवले गेले होते. ते आणि त्यांचे कुटुंबीय मोकळ्या वातावरणात वाढलेले होते. पोस्टमास्तर म्हणून खंडेराव शिकारखाने नावाचे एक गृहस्थ बीडला आले. त्यांची मुलगी विजया ही मुंबईच्या वातावरणात वाढली होती. तिने सायकलवर घरून शाळेत जायला आणि गावात फिरायला सुरुवात केली. सायकलवर एखादी मुलगी बसणे हे बीडला भलतेच आश्चर्य होते. त्यामुळे विजू रस्त्याने सायकलवर चालली की लहान मुले काही वेळा तिच्यामागे पळण्याचा प्रयत्नही करीत. आमच्या जिल्ह्यातला आष्टी तालुका अहमदनगरला लागून होता. त्यामुळे आष्टी गावातल्या लोकांना नगरमधल्या अशा काही नव्या दृश्यांची सवय होती. बीडला तसे नव्हते. आणखी दोन-तीन वर्षानंतर मुलींचे हायस्कूल सुरू झाले आणि त्यात शिकवण्यासाठी सरोजिनीबाई गंगथडे आल्या. त्यांचे पती अनंतराव हे आमच्या शाळेत मराठी शिकवीत. मध्यमवयाचे गंगथडे पती-पत्नी संध्याकाळच्या वेळी थोडेसे गावाबाहेर फिरायला जाऊ लागले. पती- पत्नीनी फिरायला जाण्याचा तेव्हा आमच्याकडे प्रघातच नव्हता. नवरा-बायको फिरायला जाताना कसे दिसतात हे पाहण्यासाठीसुद्धा लोक उत्सुक असत. त्या सगळ्यांकडे दुर्लक्ष करून त्यांचे फिरणे सुरू राहिले आणि बीडला एक चांगली प्रथा सुरू झाली.

## २

चौदा महिन्यांच्या स्थानबद्धतेनंतर काका घरी आले होते; परंतु त्यांना विश्रांती घ्यायला वेळच नव्हता. चळवळीच्या काळात नगरला असलेले बीड जिल्हा काँग्रेसचे कार्यालय माळीवेशीजवळच्या रस्त्यावर एक माडी भाड्याने घेऊन थाटण्यात आले होते. तेथे असलेले दोन टाईपरायटर्स हा माझ्या आकर्षणाचा एक विषय होता. टाईपरायटर्स पूर्वी मी पाहिलेच नव्हते, येथे तर ते हाताळताही येत होते.

पोलिस कारवाईनंतर हैदराबाद संस्थानच्या सर्व भागात

स्वामी रामानंद तीर्थांचा दौरा आयोजित करण्यात आला. ते बीडलाही येणार होते. आजवर स्वामीजी आले म्हणजे काका बहुधा एकटेच त्यांना उतरून घ्यायला अगर बसवून द्यायला बसस्टॅण्डवर जायचे. आता एका संस्थानाच्या मुक्तीचा लढा जिंकलेल्या नेत्याच्या रूपात स्वामीजी येणार होते. स्वामीजी बीडला आले तेव्हा हजार-दीड हजार लोकांनी त्यांचे स्वागत केले. त्यांची गावातून मिरवणुकही काढण्यात आली. जिल्ह्यातील आणखी काही ठिकाणी ते गेले. त्यांना काँग्रेसच्या कामासाठी काही थैल्याही लोकांनी दिल्या. त्यातील रक्कम आज हास्यास्पद वाटेल इतकी लहान होती. अशा थैल्यांची रक्कम एकदा तीस-चाळीस हजार झाली. ती रक्कमसुद्धा त्या काळात फार मोठी होती. अशी जमा झालेली एक रक्कम ट्रंकेत ठेवून तिला कुलूप लावून ट्रंक पुन्हा दोरीने रतनलालजींनी आपल्या कंबरेला बांधली व ते एका बसथांब्यावर इतर कार्यकर्त्यांसह झोपले. त्यावेळी राजकीय कार्यकर्ते डाकबंगल्यात राहत नव्हते व डाकबंगलेही फारसे नव्हते.

त्यावेळची काँग्रेस लोकशाही पद्धतीने चालवली जात होती. स्टेट काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी चक्क निवडणूक होई. स्वामी रामानंद तीर्थ आणि बी. रामकृष्णराव यांच्यात झालेल्या एका निवडणुकीत काका आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेली मतदानाची व्यवस्था हा माझ्यासाठी कुतूहलाचा आणि प्रशिक्षणाचाच भाग होता. जिल्हाभरातून आलेल्या सुमारे अडीचतीनशे प्रतिनिधींनी मतदान केले. मतमोजणी तेथेच झाली व ते आकडे हैदराबादला कळवण्यात आले.

जिल्हा काँग्रेसची पहिली निवडणूक काशीनाथराव जाधवांच्या हिंद वसतिगृहात झाली. चळवळीतले ग्रामीण भागातले कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात मतदानासाठी आले होते. जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकारिणी गुप्त मतदानाने निवडण्यात आली. त्यावेळी वरून नेमणुका होत नव्हत्या. काका अध्यक्ष, रतनलालजी कोटेचा उपाध्यक्ष आणि जाधव चिटणीस निवडले गेले. संघटनेचे काम एवढे होते की काकांना वकिली करावयाला फारसा वेळच मिळू शकत नव्हता. प्रशासन नव्याने उभे राहत होते. शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापनेत त्याला मदत करावयाची होती; अशी पुष्कळ कामे होती. शिवाय आजवर चळवळीशी फटकून राहिलेल्या अनेक संधिसाधूंचा काँग्रेसमध्ये घुसण्याचा व सत्तेचे वाटेकरी होण्याचा प्रयत्न चालू होता. त्यांच्यापासून लोकांना सावध करणे आवश्यक होते. महत्त्वाची अडचण म्हणजे नवे प्रशासन पूर्णपणे लोकाभिमुख नव्हते आणि संघटनेजवळ तर साधनेच नव्हती.

घरात असलेल्या राजकीय वातावरणाचे आणि घडणाऱ्या घडामोडींचे अनेक परिणाम माझ्यावर झाले. एखादे पाखरू सहज आसऱ्याला घरात वळचणीला येऊन बसावे तसे प्रौढपण माझ्या बालपणात येऊन बसले होते. विद्यार्थीदशेतले माझे खेळ इतर मुलांपेक्षा वेगळे झाले. मैदानी खेळांची मला फारशी आवडच नव्हती. पत्ते किंवा इतर बैठ्या खेळातही मला स्वारस्य नव्हते. काकांना भेटायला त्यांचे मित्र किंवा सहकारी आले म्हणजे त्यांच्या बोलण्यात स्वाभाविकपणे राजकीय विषयच अधिक असत. कधी कधी कुतुहलाने मी तेथेच बसलेला असे. कधी कधी काँग्रेस कार्यालयात अगर जाहीरसभेसारख्या ठिकाणीही काकांबरोबर मी जात असे. इतर पालकाप्रमाणे 'मोठ्यांच्या गप्पात तू कशाला? तू आत जा' असे म्हणून काकांनी कधीही मला हाकलले नाही. जे मी पाहत-ऐकत होतो त्याचा परिणाम कदाचित झाला असेल. आपण काकांसारखे राजकीय कार्यकर्ते-नेते व्हावे असे कुठे तरी मनात खोलवर रुजलेले असणार. आमची पत्र्याची माडी खूप लांबलचक होती. तेथे एक फलाट मांडून त्यावर सतरंजी घालून स्टेज करायचे. दोन रिकामे डबे घेऊन त्यांना भोके पाडून दोऱ्याने एकमेकांना जोडायचे. एक डबा काठीला बांधून स्टेजवर उभा करायचा आणि दुसरा डबा माडीच्या दुसऱ्या टोकाला भिंतीला खिळ्याने अडकवायचा म्हणजे माझा लाऊडस्पीकर तयार होई. समोर श्रोते म्हणून चार- सहा मित्र बसवायचे आणि सभेचा खेळ सुरू व्हावयाचा. अर्थात वक्त्याची भूमिका माझ्याकडे कायम असे. काकांची या काळात होणारी काही भाषणे मी ऐकत होतो. माझ्यात वक्तृत्वाची आवड निर्माण होण्याला काकांचे उदाहरण कारणीभूत झाले असावे. पन्नास साली जेव्हा हैदराबादेत कूळ कायदा आला तेव्हा चारचारशे- पाचपाचशे शेतकऱ्यांच्या अनेक सभात काका कूळ कायद्याच्या तरतुदी अगदी सोप्या करून समजावून सांगत असताना मी पाहिले. काकांच्या भाषणात आवेश, चढउतार किंवा चमकदार वाक्याचे अलंकरण अजीबात नसे. अतिशय सोप्या भाषेत आपण बोलावे, लोकांना सहज कळतील अशी उदाहरणे देऊन विषय स्पष्ट करावा ही काकांच्या भाषणशैलीची वैशिष्ट्ये होती. त्यांच्या भाषणात अवघड शब्द शक्यतो नसत. विषय मनाशी निश्चित असावा व समोरचे श्रोते लक्षात घेऊन त्याची मांडणी करावी हा धडा मी काकाकडूनच शिकलो.

कूळकायदा हे काँग्रेसने लोकांना दिलेले आश्वासन होते. कुळांच्या हक्कांचे रक्षण करणे आणि ज्यांच्याकडे खूपच जादा जमीन आहे त्यांची काही जमीन कसणारांना मालकीने देणे ही कूळकायद्याची उद्दिष्टे चांगलीच होती. मात्र हे महत्त्वाचे सामाजिक परिवर्तन सौहार्दाच्या वातावरणात घडू शकले नाही. जेथे जमीनमालक ब्राह्मण किंवा सामाजिकदृष्ट्या अल्पसंख्य असलेल्या एखाद्या जमातीचे होते व कूळ बहुजन समाजातले होते तेथे या परिवर्तनाला आणखी एक वेगळे परिमाण मिळाले. माझ्या चुलतचुलत्यांची-आबांची गावालगतच एक अंधारीबाग नावाची जमीन होती. भरपूर बारमाही पाणी असल्यामुळे जमिनीला बाग म्हणत. लहानू नावाचा एक शेतकरी आबांच्या वतीने ही जमीन कसत असे. लहानू वाड्यात आला म्हणजे आबा बसलेल्या

सतरंजीवरसुद्धा न बसता आदराने दूर फरशीवर बसे. आबांनाच नव्हे तर आमच्यासारख्या पोराटोरांनासुद्धा 'मालक' म्हणे. राजकारण आणि समाजकारणात जे नवीन वारे हळूहळू येऊ लागले होते त्याने कूळकायद्यातील हस्तांतरणसुद्धा ग्रासले. त्याला कटुतेची झालर आली. लहानूची सरंजामदारी संस्कृतीतील अतिनम्रता कायम राहण्याची गरज नव्हती. मात्र त्याने वाड्यात येणेच बंद केले. त्याने आबांना किंवा त्यांच्या वतीने कोणालाच शेतात येण्याला मनाई केली. दोष लहानूचा नव्हता, काळाचा होता.

२६ जानेवारी १९५० रोजी भारताचे प्रजासत्ताक अस्तित्वात येणार होते. 'जन गण मन' हे राष्ट्रगीत म्हणण्याची एक स्पर्धा तेव्हा आयोजित करण्यात आली होती. सर्व वयाच्या लोकांनी त्यात भाग घेतला होता. बीडमध्ये त्यावेळी मोठे सभागृहच अस्तित्वात नसल्यामुळे पोलिस बरॅक्समध्ये तो कार्यक्रम झाला. आश्चर्य म्हणजे त्या स्पर्धेत मला पहिले आणि सदाशिवराव बाब्रस नावाच्या बीडच्या नामवंत गायकाना दुसरे बक्षीस मिळाले. माझ्या या यशाचे श्रेय केवळ माझ्या पाठांतराला होते. बाब्रसांच्या स्वरमाधुर्याच्या मी जवळपास उभाही राहू शकत नव्हतो. फक्त झाले एवढेच की बाब्रसांना राष्ट्रगीताच्या एका ओळीचे शब्दच ऐनवेळी आठवले नाहीत, त्यामुळे त्यांना पहिले बक्षीस दिले गेले नाही. १९४८ साली आम्हाला मिळालेल्या स्वातंत्र्याला वर्ष-सव्वा वर्षच झाले होते. सरकारी कार्यालयात स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन अशा प्रसंगी राष्ट्रगीत म्हणावे लागू लागले होते. नवे राष्ट्रगीत 'जन गण मन' फारच कमी लोकांना पाठ होते आणि सरळ व्यवस्थित म्हणता येत होते. मला ते पाठ होते व साधारण चालीवर ते मी म्हणू शकत असे. त्यामुळे मला खूप मागणी असे. एकाच दिवशी तीन- चार सरकारी कार्यालयात तरी मला राष्ट्रगीत म्हणण्यासाठी पाचारण केले जाई. याचे श्रेय अर्थातच माझ्या 'गोड' गळ्याला नव्हते. तीन-चार वर्षांत राष्ट्रगीत अनेकांना म्हणता येऊ लागले व माझे महत्त्व संपले.

पोलिस कारवाईनंतर काही दिवसांनी आमच्या शाळेत थोडे बेशिस्तीचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु नंतर आम्ही आठवीत असताना बाबूसिंग चौहान शाळेचे मुख्याध्यापक झाले व चित्र पूर्णपणे बदलून गेले. बऱ्याच वर्षांपूर्वीही बाबूसिंग गुरुजी बीडला होते व ते आमच्यापैकी अनेकांच्या पालकांचेही शिक्षक होते. त्यामुळे त्यांना निर्धास्तपणे शिस्तपालनाचे काम करता येई. प्रार्थनेनंतर शाळेत पोहोचणाऱ्या विद्यार्थ्यांना बाबूसिंग गुरुजींची एक एक छडी खाल्ल्यानंतरच वर्गात जाता येऊ लागले. मीही एकदा हा प्रसाद घेतला आहे. शाळेच्या कंपाऊंडच्या बाहेर रस्त्याच्या कडेला तीन दगड मांडून त्या चुलीवर निक्क्या दुधाचा दोन आण्याला मिळणारा चहा पिण्यासाठी शाळेच्या वेळात तेथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना बाबूसिंग गुरुजी बकोटीला धरून शाळेत आणू लागले आणि छडीचा प्रसाद देऊन वर्गात पाठवू लागले. शिस्तीबरोबरच काही चांगल्या गोष्टी त्यांनी आरंभिल्या. सौताडा आणि कपिलधार अशा धबधबे असलेल्या बीड जिल्ह्यातील प्रेक्षणीय स्थळी शाळेच्या सहली त्यांनी नेल्या. त्यापूर्वी आमचे मित्रमित्रांनी जावयाच्या सहलीचे ठिकाण म्हणजे रणखांब. घरापासून दीड कि.मी. असलेला हा रणखांब कोणत्यातरी युद्धाचे स्मारक म्हणून बसवण्यात आला आहे. तो आता पूर्णपणे वस्तीतच आला आहे. सहलीला जाण्याचे आम्हा मित्रांचे आणखी एक जवळचे ठिकाण म्हणजे गावाबाहेरचे खंडेश्वरीचे देऊळ. या देवळाजवळच एका टेकडीवर आणखी एक देऊळ आहे. त्या देवळाच्या उंच दीपमाळी खूप दुरून दिसतात. ही टेकडी आणि त्यावरचे फारशी वर्दळ नसलेले देऊळ हे एक आमचे आवडीचे ठिकाण होते.

शाळेत आणखीही काही नवे उपक्रम सुरू झाले. वर्गात शिकवलेल्या इंग्रजीने भागत नाही असे दिसल्यावर बाबूसिंग गुरुजी अख्ख्या वर्गाला शाळा सुटल्यावर घरी बोलावून तेथेच जादा तास घेऊ लागले. फक्त पैसे देणाऱ्या मुलांची शिकवणी हा प्रकार फारसा सुरू झालेला नव्हता. नारायणराव गुरुजी विज्ञानाचे प्रयोग करून दाखवू लागले. ड्राईंगच्या सरकारी परीक्षांना शाळेतून विद्यार्थी बसविले जाऊ लागले.

अर्थात पूर्वीच्या राजवटीतील व्यवस्थेच्या काही खुणा शिल्लकच होत्या. मराठी, उच्च गणित आणि इंग्लंडचा इतिहास असे तीन ऐच्छिक विषय निजामी काळात होते. साहजिकच या तीनही विषयांचे वर्ग एकाचवेळी वेगवेगळ्या खोल्यात होत. मराठी विषय पुढे सक्तीचा झाला; पण वेळापत्रक मात्र ते लक्षात घेऊन केले गेलेच नाही. मराठीचा तास व ऐच्छिक विषयांचा तास वर्षभर एकाचवेळी राहिले. मी उच्च गणित ऐच्छिक घेतले होते. आठवीत उच्च गणिताच्या एकाही तासाला हजर न राहता त्याचवेळी होणाऱ्या मराठीच्या तासाला मी उपस्थित असे. उच्चगणिताचा पायाभूत भाग आठवीत शिकवला जाई. तो ज्ञातच न झाल्यामुळे नववी- दहावीत उच्चगणिताच्या वर्गांना कधी गेलो तरी मला काही समजत नसे. मराठी हा माझा आवडता विषय. आठवीत मार्तंडराव दाशरथे आम्हाला मराठी शिकवीत. कवितेचे सौंदर्य अलंकारानेच ठरवण्याचा तो काळ होता. पण मार्तंडरावांच्या शिकवण्यामुळे थोडेफार पाठांतर मात्र होऊ लागले. त्यावेळी आमच्या शाळेत मराठी शिकवणारे आणखी एक शिक्षक म्हणजे वरूडकर मास्तर. ते आमचे लांबचे नातेवाईक, जुन्या बाजारात राहायचे. त्यांचे शिकवणे मी अनुभवले नाही; पण लक्षात आहे ते त्यांनी मला सांगितलेले एक काम. वरूडकर नववीच्या वर्गाला मराठी शिकवीत. वार्षिक परीक्षेचे पेपर्स तपासण्याचा त्यांना कंटाळा असल्यामुळे त्यांनी त्यावेळी आठवीत असलेल्या मला घरी बोलावून त्यांच्याकडचे नववीचे पेपर्स तपासण्यास सांगितले. प्रारंभी संकोच वाटला पण सरांनीच हिंमत वाढवली आणि मी पेपर्स तपासून दिले. माझ्या मराठीच्या ज्ञानावर त्यांचा जरा जादाच विश्वास असावा.

दहावीच्या वर्गात आलो तेव्हा प्रभाकरराव पाटील मराठी शिकवू लागले. नव्या वाङ्मयाचे वारे लागलेला हा आमच्या गावातला पहिला शिक्षक. सरांकडे सत्यकथा येई. काही नवी पुस्तकेही त्यांच्याकडे असत. वर्गात शिकवतानाही व्यंकटेश माडगूळकर, गंगाधर गाडगीळ, अशांच्या लेखनाची जुजबी ओळख ते करून देत. जुन्या बाजारातील त्यांच्या घरी माझे जाणे-येणे सुरू झाले. अधूनमधून सत्यकथेचा ताजा अंक किंवा एखादे नवे पुस्तक ते वाचायला देऊ लागले.

अवांतर वाचनाची गोडी मला पाचवी- सहावीत असल्यापासूनच लागली होती. आमच्या घरी काका अधूनमधून काही पुस्तके आणत असत. परंतु घरात मोठा पुस्तकसंग्रह नव्हता. आमच्या शाळेत विद्यार्थ्यांनाही उपयोग करता येणारे ग्रंथालय फार नंतर अस्तित्वात आले. 'गोट्या' हे ना.धो. ताम्हनकरांचे पुस्तक त्या काळात मला फार आवडले. गोट्या हा शाळेत जाणाऱ्या मध्यमवर्गीय मुलांचा एक गुणात्मक आदर्श होता. श्यामची आई, बेबी सरोजा ही सानेगुरुजींची पुस्तके तर आवडत होतीच. बाबासाहेब परांजप्यांनी पन्नास-एक्कावनच्या सुमाराला विचार विकास मंदिर या नावाने मराठवाड्यातील काही गावांत वाचनालये स्थापन केली. या वाचनालयांना पुरवण्यात आलेली बहुतेक पुस्तके रा.ज. देशमुखांच्या 'देशमुख आणि कंपनी'ने प्रसिद्ध केलेली होती. बाबासाहेबांच्या सांगण्यावरून देशमुखांनी ही मदत केली असावी. बीडलाही असे एक वाचनालय सुरू केले गेले होते. काका त्यातील काही पुस्तके घरी आणत. त्यातील राहुल सांकृत्यायन यांचे 'वोल्गा ते गंगा' हे पुस्तक मी वाचून काढले. सगळे मला समजले नाही; पण वर्तमान हे स्वतंत्रपणे अस्तित्वात येत नाही, त्याला कुठे तरी इतिहास आणि परंपरा यांचा धागा जोडलेला असतो हा महत्त्वाचा संस्कार या पुस्तकाने माझ्यावर अप्रत्यक्षपणे केला.

देशमुख कंपनीने प्रकाशित केलेले एक पुस्तक माझ्यासाठी बायबलच बनले. ते होते 'काव्यज्योती'. राष्ट्रभक्तीपर विविध गीते आणि कविता असलेले हे पुस्तक मला एवढे आवडले की त्यातल्या बहुतेक कविता मला पाठ झाल्या. काव्यज्योतीचे संपादन वि.स. खांडेकरांनी केले होते. कुसुमाग्रजांची 'गर्जा जय जयकार' तर त्यात होतीच; शिवाय 'मनी धीर धरी शोक आवरी जननी, भेटेने नऊ महिन्यांनी' ही कुंजविहारींची कविताही त्यात होती. त्यातल्या बहतुेक कविता आजही माझ्या स्मरणात आहेत.

याच काळात काही वेगळ्या वाचनाकडेसुद्धा मी वळलो. बाबूराव अर्नाळकर यांच्या रहस्यकथा काही मित्रांच्या घरी मला सापडल्या. पुढच्या काळात मुरारराव, झुंजार, विजया, छोटू, नेताजी, घेलासेठ या मंडळींनी मला झपाटले. पनवेलजवळ चौक नावाच्या गावाजवळ असलेला हंबीरराव मोहित्यांचा वाडा तर मला खरेच अस्तित्वात असावा असे वाटत असे. नंतर बऱ्याचकाळाने त्या भागात जाण्याचा योग आला तेव्हा रस्त्याने जाताना तो वाडा दिसेल अशा आशेने मी दुतर्फा पाहिलेसुद्धा. लेखकाने निर्माण केलेले काल्पनिक जग आम्हाला त्या काळात खरेच वाटत होते.

आणखी एका प्रकारचे वाङ्मय त्या काळात अकल्पितपणे हातात आले. ते अर्थात चोरून वाचावे लागत असे. नारायण नावाचा माझा वर्गमित्र होता. त्याचे वडील सरकारी नोकरी करीत. त्यांनी स्वत: वाचण्यासाठी आणलेली काही पुस्तके व मासिके ते ऑफिसला गेल्यावर नारायणच्या हाती लागू लागली. नारायण ती वाचू लागला आणि तो अनमोल ठेवा मित्रांनाही दाखवावा असे त्याने ठरवले. ती होती पुण्याहून प्रसिद्ध होणारी 'मस्ती', 'उन्माद' अशा नावांची तीन- चार मासिके. शाळा सुटल्यानंतर नारायणकडे जायचे आणि त्याचे वडील परत यायच्यापूर्वी ते मौलिक वाचन संपवून पुस्तके पुन्हा जागच्याजागी ठेवून द्यावयाची. वयात येऊ पाहण्याच्या त्या काळात या मासिकातील काल्पनिक उत्तान शृंगारप्रसंग आकर्षक वाटत. दोन- चार अंक वाचल्यावर मात्र यात तेच ते आहे हे लक्षात आले आणि हळूहळू ते वाचन थांबले. या मासिकावर संपादकाचे नाव मेहेंदळे ऐवजी मेंधळे असे छापलेले असे. कोर्टात केस झालीच तर तो मी नव्हेच असे सांगता यावे हा त्याचा उद्देश असण्याचा संभव आहे.

गणित हा मुळातच माझा नावडता विषय. सातवी-आठवीला त्रिंबकराव गुळवेलकर गणित शिकवत. माणूस निष्ठेचा; पण जुन्या वळणाचा. गणिताविषयीची आमची नावड आणि आमचे अज्ञान वर्गातही सतत प्रगट व्हायचे. मला गणित आले नाही म्हणजे त्रिंबकराव गुरुजी म्हणायचे 'करा इतर उद्योग. मासिके काढा, भाषणे करा, अभ्यास कशाला करायचा? पुढे मग आयुष्यात काहीच करता येणार नाही तेव्हा माझी आठवण येईल.' गणितात हुशार असणारी तीन-चार मुले होती. त्यांचे भवितव्य मात्र उज्ज्वल आहे असे त्यांची नावे घेऊन गुरुजी दरवेळेला सांगत. योगायोगाचा भाग असा की गणितात हुशार असलेली ही बहुतेक सर्व मुले तहसील किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात कारकून झाली. नायब तहसीलदार किंवा जास्तीत जास्त तहसीलदार म्हणून निवृत्त झाली. माझ्या अभ्यासेत्तर उद्योगात साथ देणारे (त्रिंबकराव गुरुजींच्या शब्दात- माझ्या नादी लागलेले) एक-दोन वर्गमित्र मात्र प्राध्यापक किंवा डॉक्टर झाले. अर्थात गणित येणारे कारकून होतात आणि न येणारे आयुष्यात मोठे होतात हे मात्र खरे नव्हे.

गणिताच्या शिक्षकांशी आमचे स्नेहसंबंध निर्माण होणे शक्यच नव्हते. त्र्यंबकराव गुरुजींची तळमळ आम्हाला समजत होती. पण आम्ही अधिक जवळ आलो ते शिक्षक दुसरेच होते. गुळवेलकर या नावाचेच आणखी एक शिक्षक आम्हाला चित्रकला शिकवीत. गणिताच्या गुळवेलकराचे ते भाऊबंदच असावेत.

हस्तलिखित मासिक काढण्याच्या आमच्या उद्योगात चित्रकलेच्या गुळवलेकरांची संपूर्ण साथ असे. 'विद्यार्थी' नावाचे एक हस्तलिखित मी आणि काही मित्रांनी तयार केले होते. त्याच्या मुखपृष्ठावर सरस्वतीचे सुरेख चित्र या शिक्षकांनी आम्हाला काढून दिले. शेषगीरराव नावाच्या आमच्या एका आवडत्या शिक्षकांचे बीडच्याच एका मुलीशी लग्न झाले. लग्न समारंभात लहान करवल्या असतात तसे आमच्या वर्गातले आम्ही सात-आठ जण नवरदेवाला अक्षरश: घेरून बसलो होतो. शेवटी त्याला जरा बायकोजवळ बसू द्या असे पुरोहिताने सांगितल्यावर आम्ही दूर झालो. इंदुरकर नावाचे एक अत्यंत मृदू स्वभावाचे शिक्षक आजारी पडले. त्यांच्या दहा-पंधरा दिवसांच्या आजारपणात आम्ही दिवसातले तास-दोन तास तरी त्यांच्याच घरी असू. जनार्दनराव पांडव हे अतिशय सज्जन शिक्षक आम्हाला चित्रकला शिकवत. लाँग कोट, धोतर आणि वर काळी टोपी असा वेश असलेल्या पांडव मास्तरांना कौटुंबिक जीवनात अनेक दुर्दैवांना तोंड द्यावे लागले होते. आपली सगळी दु:खे विसरून मास्तर विद्यार्थ्यांवर विलक्षण प्रेम करत. अडचणीचा भाग एवढाच की विद्यार्थ्यांच्या दंडाला चिमटे घेण्याची त्यांना सवय होती व त्यांचे कौतुकही चिमट्यातूनच व्यक्त होई. पांडवांनी आम्हा काही विद्यार्थ्यांना चित्रकलेच्या इंटरमिजिएट, लोअर वगैरे सरकारी परीक्षांना बसवले. मी या परीक्षेत नापास झालो. कारण डिझाईन ड्राईंगच्या पेपरमध्ये माझ्या नेहमीच्या गलथानपणाने रंगाचा बाऊलच पेपरवर माझा धक्का लागून उपडा झाला होता.

## ३

मी सातव्या वर्गात असतानाच माझी मौंज झाली. आमच्या वाड्यातच बोहल्यावर ती मौंज लागली. चिखलाचे भेंडे तयार करून त्याचे बोहले घरीच एखाद्या गड्याच्या साह्याने करावयाचे. साधारण एक फूट उंचीचा लहान चौथरा व त्याच्या भिंतीकडच्या भागावर दोन्ही बाजूंनी उतरत येणारी जिन्यासारखी रचना असे ते बोहले असे. मंगल कार्यालये नव्हतीच. लग्नमौंजीसारखे समारंभ वाड्यातच होत. वाड्यातील रावसाहेबांच्या आणि दादांच्या अशा दोन्ही बैठकांत बिछायत अंथरून, गाद्यांच्या वळकट्या करून चादर गुंडाळलेले कामचलाऊ लोड बैठकीला शोभा आणत. अंगणात खूप उंच एखादे जाजम चारीबाजूंनी काथ्याने बांधून लावले म्हणजे मंडप तयार होई. खूप मोठ्या पांढऱ्या कपड्यावर लाकडी ठशाचे तांबडे छापे मारलेली जाजम हल्ली अदृश्य झाली आहेत.

मुद्रित निमंत्रणपत्रिका अजून सार्वत्रिक झाल्या नव्हत्या. समारंभाचे आणि जेवणाचे निमंत्रण घरोघर सांगण्याचे काम एक-दोन माणसे करत. हातातील यादीप्रमाणे प्रत्येकाच्या अंगणात जाऊन ओरडून निमंत्रण दिले जाई. समारंभाचे निमंत्रण लेकीसुना, इष्टमित्रांसह सर्वांना असे. जेवणाचे निमंत्रण मात्र नातेवाईक वगळता इतर कुटुंबातील एकाला असे. ज्याच्या नावे निमंत्रण ओरडून सांगितले गेले त्यानेच जेवावयास जावे असा नियम नव्हता. घरातील कोणीही गेले तरी चालत असे. नातेवाईकाकडे समक्ष जाऊन अक्षत दिली जाई. अशा समारंभातले जेवण सामान्यत: पत्रावळीवर असे. पाणी पिण्याचे फुलपात्र मात्र आपले आपण न्यावे लागे. भांडी भाड्याने देणारी मंगलकेंद्रे अस्तित्वात आली नव्हती. मोठा स्वयंपाक तयार करण्याची भांडी शहरातील एक-दोन प्रतिष्ठितांकडे असत. ज्याला लागेल त्याने ती मागून न्यावयाची आणि नंतर परत करावयाची. आमच्या वाड्यात रावसाहेबांनी असा एक संच ठेवला होता. अंगणातल्या लादणीत ठेवलेली ही भांडी आबांच्या काळातही गावात अनेकांच्या उपयोगी पडली. आणखी एक लोकोपयोगी वस्तू आबांच्या लादणीत होती. ती म्हणजे गळ. सर्वत्र आड असत व पाणी पोहऱ्याने शेंदून काढले जाई. अनेकदा सोल तुटून पोहरा आडात पडे. गळ लोखंडी व बोटीच्या नांगरासारखे तीन फाळ असलेले असत. गळ परत आणून द्यावयाचे लक्षात राहावे म्हणून नेणाराने एखादे भांडे गळ ज्याच्याकडून न्यायाचा त्याच्या घरी तारणासारखे ठेवावयाची पद्धत होती. त्यात अवमान वाटत नसे.

बीडमध्ये होणाऱ्या ब्राह्मणांच्या सर्व कौटुंबिक समारंभात स्वयंपाकासाठी पहिले प्राधान्य राम नावाच्या एका स्वयंपाक्याला असे. त्याच्याइतका चविष्ट परंतु मसालेदार किंवा तिखट नसलेला स्वयंपाक मी पुन्हा कोण्या समारंभात जेवलो नाही. रामभाऊंचे कुटुंब आणि मुलेबाळे मी कधीच पाहिली नाहीत. राम या एकेरी परंतु आपुलकीच्या संबोधनानेच रामभाऊंना सगळे गाव ओळखत असे. त्याला व्यसन होते ते फक्त सिगरेटचे. त्याचा स्वयंपाक चालू असताना कोणी तरी थोड्या अंतरावर खुर्ची टाकून बसावे आणि अधूनमधून रामभाऊंची तारीफ करून दर दीडदोन तासानंतर एक कपभर चहा व एखादी चारमिनार सिगारेट द्यावी म्हणजे रामभाऊंचा स्वयंपाक चांगला होणे निश्चित होई. लग्नाच्या मोसमात प्रत्येक लग्नानंतर मिळालेल्या मेहनतान्याची रामभाऊ अंगठी करून ठेवत. लग्नाचा हंगाम संपला की नंतरच्या काळात एक-एक अंगठी मोडून रामभाऊंचा संसार पुन्हा लग्नसराई येईपर्यंत चाले. लग्नतिथी निश्चित करताना राम त्यादिवशी मोकळा आहे की नाही हे लक्षात घेतले जाई.

ध्वनिवर्धक सार्वत्रिक होण्याला अवधी होता आणि बहुतेक लग्नमौंजीसारख्या समारंभात ते नसतच. हौशी नातेवाईक मुलींनी बेसूर मंगलाष्टके म्हणण्याची चाल अद्याप रूढ व्हावयाची होती. सदाशिवराव बाब्रस, सखारामपंत निर्मळ, विष्णुपंत धुतेकर अशी गावातील गायकमंडळी मंगलाष्टके म्हणत. शिवाय भिक्षुक मंडळीही तीन- चार मंगलाष्टके म्हणत असतच. मंगलाष्टकाची चाल मात्र परंपरागत एकच असे. त्यामुळे वातावरण एकाच सुराने भारलेले असे. निर्मळ मास्तरांचा आवाज खडा पण सुरेल होता. घाईघाईने ऐनवेळी येऊन अगदी मागे उभे राहून ते मंगलाष्टक म्हणू लागले की आता खरेच मंगलघटिका

जवळ आल्याचे सर्वांच्या लक्षात येई.

मुंजीमध्ये भिकावळ मिरवणे तेव्हा सुस्थितीतील्या कुटुंबात लोकप्रिय होते. जिल्हा काँग्रेस कमिटीला एक जीप मिळाली होती. या जीपमध्ये माझी भिकावळ काढता येईल, अशी सूचना कोण्यातरी नातेवाईक बाईंनी आईला केली. तेव्हा गावात भाडोत्री वाहने उपलब्ध नव्हती. आईने काकांना विचारले तेव्हा काँग्रेसची जीप घरच्या कामाला वापरायची नाही, असे उत्तर देऊन त्यांनी स्पष्ट नकार दिला. प्रत्यक्ष मौंजीत फोटो वगैरे काढले नव्हते. दुसऱ्या दिवशी आमच्या जवळच राहणाऱ्या नारायणराव सरवदे या गावातील एकमेव छायाचित्रकाराच्या छोट्याशा स्टुडिओमध्ये जाऊन मी माझे छायाचित्र काढून घेतले. मौंजीत मला सिल्कच्या कपड्याचा कोट आणि पँट शिवलेली होती. ते कपडे वर गांधी टोपी आणि हातात आठवीला पुरवणी वाचन म्हणून नेमलेले एक लोकमान्य टिळक चरित्र अशा परिवेशात माझे ते छायाचित्र आहे. लोकमान्यांचे छायाचित्र मुखपृष्ठावर असलेले चरित्र मी हातात घेण्यासाठी मुद्दाम निवडलेले होते. माझा तत्पूर्वीचा एकमेव फोटो मी अगदी लहान म्हणजे एकच वर्षाचा असताना बाबांचे महसूल खात्यातले मित्र लिमये यांनी काढलेला होता. लिमयांच्याजवळ एक कॅमेरा होता आणि ते छायाचित्रकार म्हणूनही फावल्या वेळात काम करीत.

वाड्यात माझे समवयस्क म्हणजे आबांचा मुलगा राजा आणि बळवंतराव दादाची धाकटी मुलगी सुलोचना. राजा जवळजवळ माझ्याच वयाचा तर सुली माझ्याहून दोन वर्षांनी वडील. बाकीची सख्खी व चुलतभावंडे आणि मी यांच्या वयात चार- पाच वर्षांपेक्षा जास्त अंतर होते. राजा अनेकवेळा त्याच्या मित्रात बाहेरच जास्त रमायचा. मोठ्या बहिणीचे लग्न झाल्यापासून सुली आम्हा भावंडातच अधिक असे. तिचे घर व आमचे घर यांच्यात सीमारेषाच उरली नव्हती. वाड्यात आम्ही मुले खेळत असलेल्या सर्व खेळात सुलीचा पुढाकार असे. मात्र हे तिचे हुंदडणे फार लवकर संपले. राधाकाकींनी तिच्या लग्नाची घाई सुरू केली. काकांना स्थळे पाहण्यास सवड मिळणे अवघड होते, पण आमच्या वाड्याजवळच असलेल्या कासाराच्या माडीत राहणाऱ्या खेर्डेकर महासबांच्या मुलाचे स्थळ कोणी तरी सुचवले. सुली पसंत पडण्याबद्दल प्रश्नच नव्हता. १३-१४ वर्षांच्या सुलीचे लग्न आमच्या वाड्यातच झाले. खेर्डेकर कुटुंब अतिशय सज्जन पण जुन्या परंपरांना जपणारे होते. सुनेची ऋतुप्राप्ती साखर वाटून नातेवाईकांना कळवणे, तिला मखरात बसवणे वगैरे सगळे सुलीबद्दलही झाले. सुली नेहमीचीच होती, पण तिच्या डोळ्यात नेहमी असायचा तो खोडकरपणा मात्र लुप्त झाला होता. तिचे लग्न झाल्यावर थोड्याच दिवसांत राधाकाकींनी वाड्यातला त्यांचा हिस्सा आम्हाला विकला आणि मोठ्या मुलीला बीडमध्येच एक छोटे घर घेऊन दिले. त्याही तिच्याकडेच राहयला गेल्या.

शाळेत असताना अभ्यासापेक्षा माझी स्वयंसेवकगिरीच जास्त जोरात होती. फळ्यावर वार्तापत्र लिहिणे, काँग्रेसच्या सभांची कर्ण्यातून गावभर जाहिरात करणे, सभेच्या व्यवस्थेत लुडबुड करणे असे अनेक उद्योग तर मी करीत होतोच; शिवाय मी सेवादल चालवत असे. बीडला त्याचे नाव काँग्रेस सेवादल हेच होते. सेवादलाला चांगलेच रूप आले आणि सुमारे दीड-दोनशे मुले रोज शाखेवर उपस्थित राहू लागली. गुलाबचंद नागोरी एकदा आमच्या वार्षिक समारंभाला आले तर एकदा बाबासाहेब परांजपे. बाबासाहेबांच्या विषयी सर्वांनाच आदर असल्यामुळे गावातल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या चालकांनी सर्व संघ स्वयंसेवकांना शिस्तीने सेवादलाच्या शाखेवर आणले व त्यांनी तेथे रांगेत बसून बाबासाहेबांचे भाषण ऐकले. हा फारच दुर्मिळ प्रसंग होता.

निजामी राजवटीत हैदराबाद राज्यात लहान प्रमाणात सहकारी चळवळ सुरू झाली होती. 'इमदादे बहामी' अशा उर्दू नावाने ओळखल्या जाणाऱ्या या चळवळीत जिल्हा सहकारी बँका आणि 'टाका' म्हणजे 'तालुका शेतकरी सहकारी संघ' अस्तित्वात होते. शेतकऱ्यांना जिल्हा बँक कर्ज देई तर त्यांच्या गरजेच्या पत्रे, नांगरासाखी लोखंडी अवजारे, सिमेंट अशा वस्तू टाका उपलब्ध करून देई. आजच्या मानाने जिल्हा बँकातर्फे होणारे कर्जवाटप नगण्य म्हणावे लागेल; परंतु त्या बँकांचा पसाराही तसाच छोटा होता. त्यावेळच्या नियमानुसार जिल्हाधिकारी जिल्हा बँकेचा पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष लोकनियुक्त असे. पुरुषोत्तमराव गोडसे अनेक वर्षे बीड तालुका शेतकी संघाचे अध्यक्ष व काका चिटणीस होते. बीड जिल्ह्यात बीड आणि अंबाजोगाई येथे दोन वेगवेगळ्या मध्यवर्ती बँका होत्या. स्वातंत्र्यानंतर त्यांचे एकत्रीकरण होऊन बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अस्तित्वात आली. काका या बँकेचे उपाध्यक्ष म्हणजे मुख्य लोकनियुक्त पदाधिकारी होते.

बँकेला मोठे ऑफिस, तिजोरी, सशस्त्र रखवालदार असे काहीच नव्हते. रोज कर्जवाटपासाठी आवश्यक तेवढी रक्कम स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या बीड शाखेतून काढून आणावयाची व खेड्यातून येणाऱ्या सभासदांना ती वाटावयाची. अगोदर सूचना दिलेल्या कर्जदारांपैकी एखाददुसरा बीडला त्या दिवशी पोहोचू शकत नसे. अशावेळी ती रक्कम आमच्या घरी काकांच्याजवळ राही. दुसऱ्या दिवशी ती पुन्हा स्टेट बँकेत भरावी लागे. रात्री वाड्यात सांभाळावी लागणारी रक्कम त्यावेळच्या मानाने मोठी म्हणजे २५-३० हजार असेल तर काका रात्रभर जवळजवळ जागेच असत. वाड्याच्या दरवाज्याला आतून लावावयाची आगळ नीट लावलेली आहे की नाही हे एक-दोन वेळा तरी ते पाहून येत. काका कनिष्ठ मध्यमवर्गीयातले होते आणि त्यांच्यासाठी ती जोखीम फारच मोठी होती.

एकदा एका फॅन्सी ड्रेस स्पर्धेसाठी मी काकांची शेरवानी

घालून गेलो. काका कोर्टात गेल्यानंतर मी हा उद्योग केला होता. मला ती शेरवानी अगदीच डगळ होत होती. माझा हा अवतार लोकांनाही फारसा चांगला दिसला नसावा. स्पर्धा आटोपून मी घरी आलो तेव्हा काका अस्वस्थपणे घरात चकरा मारत माझी वाट पाहत होते. आल्याबरोबर त्यांनी शेरवानी काढून घेतली आणि तिच्या आतल्या खिशात ठेवलेला एक छोटा कागद काढून घेतला. जिल्हा बँकेचा तो ३०-४० हजार रुपयांचा चेक होता. हरवला असता तर बरीच यातायात होणार होती. चेक सुरक्षित ठेवल्यावर मग काका खूप रागावले आणि त्यांनी मला एक थप्पडही मारली. काकांनी मला मारल्याचा तेवढा एकच प्रसंग मला आठवतो.

जिल्हा बँकेचा कर्मचारीवर्ग म्हणजे एक व्यवस्थापक, तोच हिशेबनीस आणि एक शिपाई एवढाच असे. पोलिस कारवाईनंतर एकदा वाड्यात काही चिखलकाम करावयाचे होते. चिखलकामाला मिळालेला रोजंदारीचा गडी अगदीच तरुण मुलगा होता. काकांनी त्याला तू शाळेस जातोस काय, कोणाचा मुलगा आहेस वगैरे विचारले. नंतर कळाले की त्याचे वडील तहसीलदार होते. पोलिस कारवाईनंतरच्या घडामोडीत सगळी समृद्धी धुऊन गेली. वडीलही वारले. मिळेल ते श्रमाचे काम करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. या हसनला काकांनी बँकेत शिपाई म्हणून नेमून घेतले.

१९५१ साली बीडला मोठे फौजदारी खटले चालवणारे सत्र न्यायालय स्थापन झाले. निजामी राजवटीत अशी न्यायालये फक्त सुभ्याच्या ठिकाणी म्हणजे औरंगाबाद, गुलबर्गा, वरंगल, हैदराबाद अशा ठिकाणी होती. भिकाजीपंत पाटील हे जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून बीडला आले. न्यायालयाबाहेर धोतर, बंद गळ्याचा कोट व वर काळी टोपी अशा कोणत्याही इतर मध्यमवर्गीय मराठी माणसासारख्याच वेशात वावरणारे भिकाजीपंत हे या जागेवर बीडला नेमले गेलेले पहिलेच हिंदू न्यायाधीश. एक सचोटीचे न्यायाधीश म्हणून ते थोड्याच काळात ओळखले जाऊ लागले. निजामी काळातील अनेक न्यायाधीश नि:स्पृह होते; पण काही छोट्या परंतु अनिष्ट गोष्टीकडे सरंजामदारी व्यवस्थेत असे चालायचेच म्हणून ते दुर्लक्ष करीत. पाटलांचे वर्तन मात्र अगदीच काटेकोर असे. बीडला ते आले तेव्हा आंब्याचे दिवस होते. एका यशस्वी वकिलांनी पाटलांच्याकडे आंब्याची एक डाली पाठवून दिली. नव्या न्यायाधीशांची ओळख व्हावी आणि त्याला काय काय चालते याचाही अंदाज घ्यावा असा दुहेरी हेतू. पण पाटलांनी ती डाली ताबडतोब परत पाठवली. त्यानंतर पुन्हा कोणी असा प्रयत्न केला नाही. आमच्या शाळेत काही निमित्ताने एक-दोन वेळा भिकाजीपंत आले. त्यांचे एका कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणही झाले. साधे राहणारा आणि मराठी बोलणारा जिल्हा न्यायाधीश हे गावात अप्रूप होते.

सत्र न्यायालय (सेशन्स कोर्ट) स्थापन झाल्यामुळे बीडला अधिक काम करता येईल म्हणून अंबाजोगाईहून दोन-तीन वकील बीडला आले. अंबाजोगाईला तालुका न्यायालयच होते, पण वकीलवर्ग अभ्यासू होता. बीडला आलेल्या मधुसूदन गणेश वैद्य व पुरुषोत्तमराव चौसाळकर या दोन्ही वकिलांकडे भरपूर काम येऊ लागले. चौसाळकरांकडे फौजदारी तर वैद्यांकडे दिवाणी काम अधिक असे. चौसाळकर वागायला अघळपघळ, बोलताना थोडेसे मीठमसाला लावण्याची सवय असलेले होते; एकदा बीडला कवी यशवंत आले होते त्यांच्या काव्यगायनाचा कार्यक्रम आमच्या शाळेच्या हॉलमध्ये झाला. बाहेरून आलेल्या मोठ्या व्यक्तीला मानपत्र दिले जाते हे मला माहीत होते. मी एक हस्तलिखित मानपात्र शक्यतो चांगले अक्षर काढून तयार केले व ते यशवंतांना देण्याची परवानगी मागितली. समारंभात पुढाकार चौसाळकरांचा होता. आठवी-नववीतला मुलगा मानपत्र काय लिहिणार या प्रामाणिक शंकेने त्यांनी माझ्या हातातून ते तपासणीसाठी घेतले व घेताना 'बघू तर, मानपत्र आहे की अपमानपत्र आहे' असे मला दुखवून गेलेले उद्‌गारही काढले. मात्र नंतर त्यांनी ते मानपत्र मला वाचू दिले आणि यशवंतांनीही माझे कौतुक केले.

वैद्य मात्र बोलण्यात काटेकोर असत. वैद्य कुटुंबाचा पुढील काळात आमचा खूपच स्नेह झाला. वैद्यांना त्यांच्या मुलाप्रमाणेच मीही भाऊ म्हणत असे. काकाबरोबरच्या भाऊंच्या मैत्रीला काकांच्या थोड्या ज्येष्ठत्वामुळे भाऊंच्या मनात असलेल्या आदराचाही एक पदर होता. दिवाणी कायद्यातील कठीण व वादग्रस्त मुद्दे त्या दोघांच्याही आवडीचे विषय. वैद्य प्रत्यक्ष राजकारणात नसले तरी त्यांनाही सार्वजनिक कामाची आवड होती. सार्वजनिक संस्था चालवण्यासाठी आवश्यक असलेला व्यवस्थितपणा भाऊंकडे उपजतच होता, त्याचबरोबर स्वत:ला झीज लावून घेण्याचीही त्यांची तयारी असे. वकिली हा सचोटीने करण्याचा व्यवसाय आहे, असे काकाप्रमाणेच भाऊही मानत असत.

सत्र न्यायालयात सरकारतर्फे म्हणजे फिर्यादी पक्षातर्फे काम पाहणारे सरकारी वकील म्हणून औरंगाबादचे लक्ष्मणराव कुलकर्णी यांची नेमणूक झाली. ते बीडला राहवयास आले. त्यावेळी सरकारी वकील फक्त पात्रतेच्या निकषावरच नेमले जात. लक्ष्मणराव निष्णात व मेहनती वकील तर होतेच, शिवाय ते नि:स्पृहही होते. धोंडापुऱ्यात एक खूप मोठे आवार असलेला वाडा होता. डॉ. नातूंच्या या वाड्यात अनेक छोट्या छोट्या इमारती होत्या. त्यात वेगवेगळ्या भाडेकरूंची बिऱ्हाडे असत. त्यातल्याच एका घरात लक्ष्मणराव तर दुसऱ्यात वैद्य राहत. आमच्या वाड्यापासून नातूवाडा जवळच होता.

दत्तमंदिरात सार्वजनिक गणपती बसत असला तरी मध्यंतरीच्या पाच- सहा वर्षांत तेथे उत्सवातील इतर कार्यक्रम

झालेच नव्हते. विविध कार्यक्रम नऊ दिवस करून या उत्सवाचे पुनरूज्जीवन करावे असे आम्ही काही विद्यार्थ्यांनीच ठरवले. गणपतराव पत्कीमास्तरांचे त्याला नुसतेच मार्गदर्शन नव्हते तर ते स्वत: त्यात भागही घेत असत. नंदकुमार आणि विजय ही त्यांची दोन मुले तर माझ्या मित्रमंडळातच होती. या दोघांची मला गणेशोत्सवाच्या आयोजनात मोठी साथ असे. एखादी छोटी नाटिका, वक्तृत्व स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, जादूचे प्रयोग आणि काही खेळ असा कार्यक्रम आम्ही आखत असू. एखाद्या बाहेरच्या वक्त्याचे भाषणही होई. काही वेळा गावातल्या शाळा वेगवेगळ्या नाटिका बसवत व त्या सादर करीत. माझी बहीण उषा त्यावेळी मुलीच्या हायस्कुलात होती. तिनेही अशा एका नाटिकेत भाग घेतला होता. विजेत्यांना पारितोषिक म्हणजे पाच ते दहा रुपयांना मिळू शकणारी एखादी वस्तू असे. ज्यांना आम्ही अशी बक्षिसे दिली त्यातली एक विजेती म्हणजे चंद्रकांतराव गोडसे यांची मुलगी विद्या; ती पुढे जितेंद्र अभिषेकींची पत्नी झाली. रोषणाई, ध्वनिवर्धक, भव्य मंडप अशा गोष्टी आम्हाला परवडण्यासारख्याच नव्हत्या; परंतु बीडमध्ये अशा कार्यक्रमाचे तेव्हा असलेले नावीन्य आणि थोडे आमचे कौतुक यामुळे लोकांची उपस्थिती बरी असे.

दत्तमंदिर गणेशोत्सवात आम्ही केलेल्या कार्यक्रमांपैकी सर्वांत नावीन्यपूर्ण होता अभिरूप लोकसभेचा कार्यक्रम. त्यावेळी नांदेडच्या महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक असलेले भ. व्यं. देशमुख बीडला काही कामानिमित्त आले होते. त्यांना आम्ही आमच्या लोकसभेचे सभापती बनण्याची विनंती केली. तीन- चार तास तालीम करून आम्ही दहा- बारा मित्रांनी आपल्या भूमिका समजावून घेतल्या. आम्ही सारेच हायस्कुलातले विद्यार्थी होतो. तुटपुंज्या तयारीवरसुद्धा हा कार्यक्रम त्यामानाने बरा झाला. देशमुखांनी तर खूपच कौतुक केले.

दत्तमंदिर हे गावात सार्वजनिक कार्यक्रम, लग्नसमारंभ यांच्यासाठी सोयीचे ठिकाण होते. एक दोनवडी दहा खणांची इमारत दत्तमूर्तीच्या समोरच होती. मधल्या साठ-सत्तर फूट मोकळ्या जागेत फरशी बसवलेली होती, तेथे लोकांना बसता येई. दक्षिणेकडे एक मोठी बखळ होती. तिच्यात एका बाजूला बांधलेला ओटा होता. बीडला नाटकमंडळ्या कमी येत. परंतु आल्या म्हणजे त्यांची नाटके दत्तमंदिराच्या बखळीतच होत. ओट्याचा स्टेज म्हणून उपयोग होई. अशा नाटकापैकी मला लक्षात राहिलेले पहिले नाटक म्हणजे नानासाहेब शिरगोपकरांच्या आनंद संगीत मंडळीचे 'गोकुळचा चोर'. कृष्णाच्या यमुना तीरावरील लीलेसारखे नाटकात न दाखवता येऊ शकणारे प्रसंग ही नाटकमंडळी एका प्रोजेक्टरच्या साह्याने छोट्या पडद्यावर दाखवावयाची. नाटकात चित्रपट समाविष्ट करणारी ही पहिलीच नाटकमंडळी असावी. ते प्रेक्षकांना मोठेच आकर्षण असे.

या नाटकात कृष्णाचे काम करणारा मुलगा मखमली टोपी घालून गावात एखादी चक्कर मारी त्यावेळी लोक कुतुहलाने त्याच्याकडे बघत असत. दत्तमंदिरात आमच्या स्थानिक कलावंतांनीही दोन नाटके केली. मंदिराच्या विस्तारित बांधकामाला मदत मिळावी म्हणून हे नाट्यप्रयोग झाले होते. सदाशिवराव बब्रस, दासोबा मांडे, गोपाळराव काळे अशा स्थानिक कलावंतांनी त्यात भूमिका केल्या होत्या. त्यातले 'मानापमान' अजून माझ्या लक्षात आहे. लक्ष्मीधराच्या भूमिकेत काम करणाऱ्या गोपाळराव काळ्यांनी नाटकातले संवाद म्हणता म्हणता मधेच स्थानिक डॉक्टरांची नावे घुसडली त्यामुळे प्रेक्षकांत मोठाच हशा पिकला होता. नंतरच्या काळात दत्तमंदिर हे नाटकाचे ठिकाणही राहिले नाही आणि जुनी नाटकेही पुन्हा झाली नाहीत. गावातल्या नव्या कलावंतांचे लक्ष नव्या नाटकाकडे वळले.

हैदराबादमध्ये लोकांचे राज्य यावे म्हणून ज्यांनी निजामाविरुद्ध संघर्ष केला आणि स्वातंत्र्य मिळवले ते लोक सत्तेत यावेत, मंत्री व्हावेत अशी सर्वसामान्य लोकांची अपेक्षा होती. अशा काळात एक अनपेक्षित गोष्ट घडून आली. स्वातंत्र्यचळवळीत स्वामीजींचे प्रमुख सहकारी असलेले गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे आणि त्यांच्या अनुयायांनी कॉंग्रेस पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. मराठवाडा प्रांतिक कॉंग्रेसची एक विशेष अनौपचारिक बैठक काशीनाथराव जाधव चालवत असलेल्या हिंद वसतिगृहात झाली. या बैठकीत कॉंग्रेस सोडून जाणाऱ्या सहकाऱ्यांना राजीनामे मागे घेण्याचे आवाहन करण्यात आले. मराठवाड्यात स्वामीजींच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसमध्ये काम करणारे सर्व कार्यकर्ते एकमेकांशी जिव्हाळ्याने वागत व त्यांचे कुटुंबासारखे संबंध होते. लढ्याच्या कठीण काळात एकमेकांची दु:खे त्यांनी वाटून घेतली होती. आता वाटा वेगळ्या होत होत्या. यावेळी उस्मानाबादच्या फुलचंद गांधींनी या बैठकीत केलेले भाषण अतिशय भावनाप्रधान होते. बोलताना फुलचंदजींना हुंदके आवरत नव्हते आणि जे राजीनामा देणार होते त्यांच्याही डोळ्यांत पाणी होते. कॉंग्रेस न सोडण्याचा निर्णय घेणाऱ्यात काका होते व ते स्वामीजीबरोबर राहणार होते.

१९५१-५२ साली हैदराबाद राज्यात पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ होते व काका बीड जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. स्वातंत्र्य मिळवणारी संघटना म्हणून कॉंग्रेसविषयी जनमानसात प्रेम असले तरी जातीयवादाचे वारे मोठ्याप्रमाणात बाहेरून येऊ लागले होते. त्यावेळी जिल्हा कॉंग्रेसच्या शिफारशींना जवळजवळ अंतिम रूप असे. सर्व गोष्टी दिल्लीवरून ठरत नव्हत्या. चौदा महिन्यांच्या तुरुंगवासानंतर बाहेर आल्यावर काकांनी वकिलीला पुन्हा नुकतीच सुरुवात केली होती. घर पुन्हा थोडेसे सावरू लागले होते. काकांना निवडणूक लढवण्याची

अजिबात इच्छा नव्हती. जिल्ह्यातील मतदारसंघात उमेदवारांच्या शिफारशी करताना वेगवेगळ्या जातींना प्रतिनिधीत्व मिळेल याची शक्यतो खबरदारी काकांनी घेतली होती. मराठा, धनगर, मारवाडी, लिंगायत अशांचा त्यांनी सुचवलेल्या उमेदवारात समावेश होता; तरीही सगळ्याच जुन्या ब्राह्मण कार्यकर्त्यांना पूर्णपणे वगळणे शक्य नव्हते. अंबाजोगाई हा तेव्हा द्विसदस्य मतदारसंघ होता. अंबाजोगाई हे लढ्याच्या काळातले जागृत गाव व तेथे बरेच कार्यकर्ते उपलब्ध होते. यापैकी सर्वात ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक म्हणून नारायणराव जोशी यांचा काँग्रेस उमेदवारीवर हक्क होता. दुर्दैवाने काही खरे-खोटे आरोप त्यांच्यावर करण्यात आले आणि प्रदेश नेतृत्वाला त्यांना तिकीट देता येणे अशक्य झाले. तेथून दुसऱ्या कोणाचे नाव सुचवले जाऊ शकले नाही. शेवटी ऐनवेळी स्वामीजींनी काकांना तुम्हीच तेथून निवडणूक लढवा असा आदेश दिला. नाईलाजाने ही उमेदवारी स्वीकारून काकांनी निवडणूक लढवली. या मतदारसंघातील दुसरी जागा अनुसूचित जातीसाठी राखीव होती. केशवराव कांबळे हे महार समाजातील सुशिक्षित व सद्वर्तनी गृहस्थ काकांचे स्नेही होते. त्यांचे नाव काकांनी सुचवले होते. प्रदेश काँग्रेसने ते मान्यही केले. केंद्रीय नेतृत्वात जगजीवनराम प्रभावी होते व त्यांना महार समाजाऐवजी आपल्या समाजातील उमेदवार हवे होते. त्यांनी कांबळे यांचे तिकीट रद्द करावयास लावून द्वारकाप्रसाद मुक्ते यांना तिकीट देवविले.

प्रचंड मोठ्या मतदारसंघात काकांच्या प्रचारासाठी साधनेच उपलब्ध नव्हती. एकुलती एक जीप लोकसभेचे उमेदवार श्रीधर वामन नाईक यांनी पाठवली होती. तिच्यावरच पूर्ण भिस्त होती. सुदैव एवढेच की पैसे घेऊन प्रचार करण्याची प्रथा सुरू झाली नव्हती. स्वत:च्या घरी जेवण करून कार्यकर्ते उमेदवाराच्या जीपमध्ये बसत. मी आणि आई आम्ही दोघेही अंबाजोगाईत महिनाभर होतो. सोनवळकर आणि भावठाणकर या आमच्या नातेवाईक कुटुंबात आमचा मुक्काम असे. आम्ही कुटुंबीयच नव्हे तर काकासुद्धा बीड-अंबाजोगाई हा प्रवास निवडणूक काळातही बसनेच करीत असत.

अडचणीत भर अशी होती की काँग्रेसमधून फुटून बाहेर पडलेल्या गोविंदभाई- बाबासाहेब गटाचे एक नेते बाबासाहेब परांजपे हेच बीड मतदारसंघातून लोकसभेसाठी विरोधी पक्षाचे उमेदवार होते. बाबासाहेबांशी अंबाजोगाई शहरात विलक्षण आदर होता. शिवाय काकांचे स्वातंत्र्यलढ्यातले अनेक स्नेही विरोधी जनता लोकशाही आघाडीत सक्रिय होते. त्यांनी विधानसभेलाही काकांच्या विरोधात टाक नावाच्या एका कार्यकर्त्याला उभे केले होते. तो निवडून येण्याचा संभव नव्हता; मात्र तो जी मते घेईल ती काकांचीच कमी होणार होती. मूळ संघर्ष काँग्रेस आणि शेतकरी कामगारपक्ष असा होता. काकांना १४२९६ मते पडली तर त्यांचे विरोधक शेका पक्षाचे वामनराव देशमुख यांना १८००५ मते पडून ते निवडून आले. टाकांना सात हजारांच्या आसपास मते मिळाली होती. विजयी उमेदवार व काका यांच्या मतातील फरकापेक्षा ती अधिक होती. त्यांनी निवडणूक लढवली नसती तर कदाचित निकाल वेगळा लागला असता. राखीव जागेवर मात्र शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या आरक यांचा पराभव होऊन काँग्रेसचे मुक्ते निवडून आले.

निवडणूक लढवावयाला आज जसे वारेमाप पैसे लागतात तसे कोणत्याच उमेदवाराजवळ नव्हते. पण अगदी किमान आणि अत्यावश्यक खर्चही करणे अवघड जाई. काही नव्यापिढीच्या कार्यकर्त्यांना जो खर्च आवश्यक वाटे तोही उमेदवाराच्या आवाक्यात नसे. काकांच्या मतदारसंघातील परळीच्या एका तरुण कार्यकर्त्याने २०-२५ स्वयंसेवकांना शर्ट आणि विजारी शिवल्या व त्याचे बिल पाठवले. तोही खर्च काकांना अमान्य होता. या निवडणुकीत बीडला नुकतेच आलेले मधुसुदनराव वैद्य काकांच्याबरोबर बऱ्याच गावी फिरले. अंबाजोगाईचे रहिवासी आणि उच्च न्यायालयाचे नंतर न्यायाधीश झालेले श्रीरामपंत देशपांडेही काही ठिकाणी काकाबरोबर आले होते.

बावन्नची निवडणूक ही पहिलीच सार्वत्रिक निवडणूक होती. एकाचवेळी सर्वत्र मतदान होत नसे. एका जिल्ह्यातल्या वेगवेगळ्या मतदारसंघात वेगवेगळ्या तारखांना मतदान होई. अंबाजोगाई मतदारसंघाचे मतदान आटोपल्यावर मी गेवराईला गेलो. काँग्रेसचे उमेदवार होते काकांचे मित्र डॉ. तुकारामपंत भोले. त्यांच्याविरुद्ध कामगार किसान पक्षातर्फे रामराव आवरगावकर उभे होते. साधनसामुग्रीच्या अभावाबद्दल तर सर्वच उमेदवारांत स्पर्धा होती. आवरगावकर तर सायकलवरच फिरत. आणखी एक उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक लढवत होते ते होते आमचे जवळचे नातेवाईक कृष्णाजी गोविंद ऊर्फ बाबूराव हिटनाळीकर. मी त्यांच्याकडेच जेवत असे आणि इतरवेळी भोल्यांच्या निवडणूक कार्यालयात बसत असे. या निवडणुकीत बीडचा राष्ट्रीय मेळा काँग्रेसचा प्रचार करीत होता. काँग्रेस कार्यकर्ते आणि सहानुभूतीदार यांनी चालवलेला हा मेळा विनामुशाहिरा गेवराई तालुक्यात फिरत होता. बीड आणि गेवराई यांच्या दरम्यान असलेल्या हिरापूर गावी या मेळ्याच्या बरोबर मीही गेलो होतो. मेळ्याच्या कार्यक्रमाला बऱ्यापैकी गर्दी होती. त्याच रात्री आवरगावकरांचे एक प्रचारक, बीडचे एक वकील तेथे आले आणि त्यांनी दहा-पाच गावकऱ्यांबरोबर काही बोलणी केली व ते निघून गेले. मेळ्यातील प्रचारापेक्षा त्यांचा हा खासगी प्रचार अधिक प्रभावी होता हे मतदानाचे आकडे पाहून नंतर कळाले. हिरापूरला आम्ही होतो त्याच्या दुसऱ्या दिवशी मतदान झाले. आम्हाला बीडला परत जावयाचे होते पण एकही बस हिरापूरला त्यादिवशी थांबली नाही. जाणाऱ्या तिन्हीचारी बसेस गच्च भरलेल्या होत्या. आमच्या

उमेदवाराजवळ तर वाहनच नव्हते. दोन रात्री हिरापूर गावाबाहेर रस्त्यावरच्या एका दुकानात आम्ही सात- आठ जण झोपत होतो. रात्री आंबट वासाने झोप येत नसे. ते दुकान शिंदींच्या कंत्राटदाराचे होते व त्याने आपला माल त्या दुकानातच साठवून ठेवलेला होता. गावातील लोक आमच्या अतिथ्याला फारसे उत्सुक दिसले नाहीत. एका टपरीवाल्याने दोन दिवस भजी करून दिली आणि त्यावर आम्ही भागवून घेतले.

१९५३ च्या मार्च महिन्यात माझी मॅट्रिकची परीक्षा होती आणि दोन महिने अगोदर जानेवारी महिन्यात हैदराबादेत अ.भा. काँग्रेसचे अधिवेशन भरणार होते. अधिवेशनाला काका जाणार होतेच, आईलाही नेण्याचा त्यांचा विचार चालू होता. मलाही बरोबर घेऊन जा असा मी हट्ट धरला. 'परीक्षा दोन महिन्यांवर आली आहे, तू कशाला येतोस' असे काकांनी सांगून पाहिले पण मी माझा हट्ट सोडला नाही. अनेक मोठमोठे पुढारी तेथे पाहता येणार होते. शेवटी काकांनी आईला व मला दोघांनाही हैदराबादला नेले. स्वामीजी स्वागताध्यक्ष होते. हैदराबादमधील ज्या निवडक सहकाऱ्यांना स्वामीजींनी व्यासपीठावर बसण्याची आमंत्रित केले होते त्यात काकाही होते. व्यासपीठावर शंभर- दीडशे लोक होते. माझी व आईची व्यवस्था खाली प्रतिनिधींच्या बाजूला काकांनी करविली. खुले अधिवेशन व विषय नियामक समिती यात झालेली भाषणे आज फारशी लक्षात नाहीत. लक्षात आहे ते 'जहां जवाहरलाल का कदम होगा वहा शेख अब्दुल्ला का दिल बिछा होगा' वगैरे भाषेतील नाटकी ढंगातले शेखसाहेबांचे आवेशपूर्ण भाषण. एवढी प्रचंड मोठी गर्दी मात्र मी प्रथमच पाहत होतो. या अधिवेशनात काकांना एकदा मी बराच त्रास दिला. अधिवेशनाचे स्थळ नानलनगर गावापासून दूर होते. प्रतिनिधी निवासात इतरांबरोबर मी जेवलो नव्हतो व तेथील वेळ संपल्यानंतर रात्री दहा वाजता मला भूक लागली होती. मला भूक लागली आहे असे मी आईला व काकांना सांगितले. आई थोडी रागावली पण दोघे मला घेऊन दोन-तीन मैल पायपीट करीत गेले आणि एक हॉटेल हुडकले व मला खाऊ घातले.

काँग्रेस अधिवेशन संपवून बीडला परत आल्यावर मी विखुरलेली पुस्तके नीट जमा करून अभ्यासाचा निश्चय केला. परीक्षेला दोन महिनेच उरले होते. दोन-तीनदा वेळापत्रके केली; मात्र वेळापत्रक तयार करण्यासाठी जेवढा वेळ मी खर्च केला तेवढा वेळही मी प्रत्यक्ष अभ्यास केला नाही. माझा अधूनमधून अभ्यास घेणाऱ्या माझ्या चुलत्यांना -बाबांना मी नापास होणार अशी भीती वाटू लागली. त्यांचा गणित विषय फार चांगला होता. त्यांनी अभ्यासक्रम पाहून आणि मागील काही वर्षांच्या प्रश्नपत्रिका पाहून उच्च गणित आणि प्राथमिक गणित या दोन्ही विषयांतील दहा- बारा, दहा-बारा गणिते मला पंधरा दिवसांत शिकवली. त्या पद्धतीचे कोणतेही गणित मला सोडवता येईल याची तयारी करून घेतली. सुदैवाने बाबांनी शिकवलेल्या गणिताच्या उदाहरणापैकी उच्चगणितात तीन आणि प्राथमिक गणितात अडीच गणिते परीक्षेत आली. त्यामुळे उच्चगणितात २८ आणि साध्या गणितात २५ गुण मला मिळाले.

इंग्रजी हा भाषा विषय असला तरी व्याकरण शिकवले गेले त्यावेळी मी वर्गात नसणार. एके दिवशी काकांना (माझ्या वडलांना) काय लहर आली माहीत नाही, त्यांनी क्रियापद कसे चालवतात असा प्रश्न मला विचारला. मला येत नाही हे कळाल्यावर त्यांना काळजी वाटणे स्वाभाविक होते. आम्ही गच्चीवर झोपण्याच्या तयारीत होतो. काकांनी आयुष्यात प्रथमच मला इंग्रजी शिकवायला प्रारंभ केला. I go, We go, He goes असे क्रियापद कसे चालते हे त्यांनी माझ्याकडून पाठ करून घेतले. कंदीलाच्या उजेडात काकांनी दिलेला हा शालेय शिक्षणातला पहिला आणि शेवटचा पाठ होता. त्यांच्या या तास- दीड तास शिकवण्याने माझ्या इंग्रजी भाषा शिक्षणाचा पायाच घातला.

परीक्षेच्या आधी केवळ दोन महिने इंग्रजी, उच्चगणित आणि गणित या तीन महत्त्वाच्या विषयांची ही अवस्था आणि तुंटपुंजी तयारी मलाही कळत होती. परीक्षा देऊन आल्यावर बाबांनी दोन्ही गणिताचे पेपर घरी सोडवून घेतले व दोन्हीतही २५-२६ मार्क मिळतील असा अंदाज बांधला. त्यामुळे आपण मॅट्रिकला यंदा पास होणार नाही हे मी मनोमन गृहित धरले. सरासरी ३० टक्के गुण असतील तर दोन विषयांत २५ टक्के गुण असले तरी चालते हा उदार नियम त्यावेळी मला माहीत नव्हता. त्याकाळच्या माझ्या इतर उद्योगात वार्तापत्र लिहिण्याचा एक उद्योग होता. घराजवळच्या चौकातील एका मोठ्या फळ्यावर रोजच्या ठळक बातम्या खडूने लिहावयाच्या असा माझा परिपाठ होता. आपण पास होणार नसलो तरी मॅट्रिकचा निकाल हा तर फळ्यावर लिहिणे आवश्यक आहे अशा थोड्याशा निर्लज्ज कर्तव्यदक्षतेने मी निकालाच्या दिवशी सायकलवर बसस्टॅण्डवर गेलो. निकाल तेव्हा हैदराबादच्या वृत्तपत्रात येई. १९५३ सालीसुद्धा हैदराबादला मुख्य दैनिके उर्दूच होती. बरीच मुले आणि आमचे चार- दोन शिक्षक बसस्टॅण्डवर आले होते. हैदराबादहून रेल्वेने जालन्यापर्यंत आणि तेथून बसने बीडला सकाळी नऊ-दहा वाजेपर्यंत वृत्तपत्रे येत. एक वृत्तपत्र घेतले आणि इतरांचे क्रमांक पाहू लागलो. माझा क्रमांक तर पाहण्याची गरजच नव्हती. एवढ्यात समोर नरेन्द्र गोडसे हे माझे एक शिक्षक दिसले. त्यांनी मला विचारले तुझा परीक्षा क्रमांक काय? मी त्यांना तो सांगितला. त्यांनी त्यांच्या हातातील वृत्तपत्रात तो पाहिला आणि माझे अभिनंदन केले. मी आश्चर्याने त्यांच्याकडे पाहत राहिलो. माझ्या हातातील वृत्तपत्रातही मी माझा ७०४ हा क्रमांक पुन्हा पाहिला. तो दिसताच मला

आनंदाचा आणि आश्चर्याचा धक्काच बसला. मी पास झालो असे तेथल्या सर्व परिचितांना मोठ्याने ओरडून सांगून मी जोरात सायकल घराकडे दामटली. मी पास होणार नाही हीच वाड्यात सर्वांची कल्पना होती. त्यांना या बातमीने खूपच आनंद झाला. सर्वात जास्त म्हणजे आजीला आणि आईला.

मॅट्रिकच्या परीक्षेतील अनपेक्षित यशाचा माझा आनंद फार काळ टिकला नाही. आठ-दहा दिवसांत मला बोर्डाकडून टपालाने गुणपत्रक आले. ते पाहताच मला धक्काच बसला. मला एकूण २०९ गुण मिळाले होते. त्यावेळी मॅट्रिकला सहा विषय असत. कोणत्याही दोन विषयांत किमान २५ गुण व एकूण सरासरी गुण ३० टक्के म्हणजे एकूण गुण १८० असतील तर विद्यार्थी उत्तीर्ण होई. मात्र उस्मानिया विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयात प्रवेशासाठी किमान ३५ टक्के म्हणजे २१० गुण हवे होते. मला त्यापेक्षा एक गुण कमी मिळाला होता. मॅट्रिक पास होऊनही पुढील शिक्षण घेता येणार नव्हते. मी खूपच निराश झालो.

दोन- तीन दिवसातच मला कोणी तरी सांगितले की दोन किंवा अधिक वेळा हप्त्याने वेगवेगळे विषय उत्तीर्ण झालेल्या मराठवाड्यातील काही विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाच्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला आहे. परीक्षा अशी कंपार्टमेंटली उत्तीर्ण झालेल्यांना उस्मानिया विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात प्रवेश मिळू शकत नसे. ३५ टक्क्यांपेक्षा कमी गुण असलेल्यांनाही नागपूर विद्यापीठ आश्रय देत असेल अशी आशा वाटू लागली. मराठवाड्यातल्या बहुतेक मुलांनी वाशीम किंवा अमरावती येथे प्रवेश घेतला होता. बीडच्या बापूराव येळंबकरांचा मुलगा साहेबराव कदम हा अमरावतीच्या शिवाजी महाविद्यालयात शिकत होता. त्याच्या घरी जाऊन मी त्याला भेटलो. त्याने किमान गुणाची अट नागपूर विद्यापीठाने ठेवलेली नाही, मॅट्रिक उत्तीर्ण असले म्हणजे पुरे अशी माहिती सांगितली. त्याने अमरावतीला प्रवेश घेण्याचा मला आग्रह केला. त्याप्रमाणे मी अमरावतीला शिकायला जावे असा विचार केला. काकांनी त्याला संमती दिली. साहेबराव आठ- दहा दिवसांनी जाणार होता. प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे वगैरे तयारी केली व अमरावतीला जाण्याचे ठरवले.

कपड्याचे पहावे लागणार होते. आतापर्यंत मी पँट फारशा वापरल्याच नव्हत्या. आता कॉलेजमध्ये जायचे होते. म्हणून कॉटनच्या दोन पँटस् शिवल्या. दोन-तीन विजारी आणि दोन-तीन शर्ट होतेच. त्याच्यावर भागणार होते. मला अजून पंधरावे वर्षही पूर्ण झालेले नव्हते. घर सोडून बराच काळ बाहेर राहण्याचा अनुभवच नव्हता. मी अमरावतीसारख्या त्यावेळी दूर वाटणाऱ्या गावी शिकायला जातो आहे याबद्दलची काळजी घरात सर्वांना, विशेषत: आजीला वाटणे साहजिक होते.

बीडहून औरंगाबादला बसने, तेथून रेल्वेने मनमाड, पुन्हा रेल्वे बदलून बडनेरा आणि तेथून अमरावती असा प्रवास होता. बीडला रेल्वेच नव्हती. त्यामुळे रेल्वेत बसण्याचे नावीन्य अजून थोडे कायम होते. मनमाडनंतर ब्रॉडगेज सुरू झाली. फारशी गर्दी नसतानाही डब्याच्या दारात दोन्ही बाजूच्या दांड्यांना धरून मी उभा राहिलो. गाडी चालताना वळण आले म्हणजे पुढचे आणि मागचे डबे थोडावेळ दिसत. ते पाहताना मजा वाटू लागली. त्यासाठी एकदा थोडेसे वाकलो असताना खिशातले हौसेने घेतलेले पैशाचे पाकीट खाली पडले. गाडी खूप पुढे निघून गेली होती. साखळी ओढून ती थांबवण्याला पुरेसे कारण नव्हते आणि हिंमतही नव्हती. सुदैवाने रेल्वेचे तिकीट मात्र विजारीच्या खिशात होते. कपडे आणि प्रवेशासाठी आवश्यक असलेले कागद ट्रंकेत होते. निष्कांचन अवस्थेत अमरावतीला पोहोचल्यावर रिक्षा केला आणि मुक्कामावर पोहोचलो. रिक्षाचे पैसेही साहेबराव आणि इतर मित्रांनी दिले.

थोड्यावेळाने जवळच असलेल्या शिवाजी महाविद्यालयात जाऊन आलो. प्रवेशाची अंतिम तारीख योगायोगाने त्याच दिवशी होती. साहेबराव रहात होता त्या मोर्शी रोडवरच्या डोळे सावकारांच्या कामचलाऊ बंगल्यात मराठवाड्यातील पुष्कळ मुले रहात होती. तेथेच मी राहणार होतो. नव्याने परिचित झालेल्या या मित्रांपैकी दोन-तीन जणांनी जवळच्या शिल्लक पैशातून मला आवश्यक असलेले दीडशे रुपये उभे केले आणि ते भरून मी शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यातून उरलेल्या पैशातून बीडला काकांना पैसे पाठवा म्हणून तार केली. घरचे कोणी जवळ नसले तरी मदतीला मित्रही उभे राहू शकतात या नव्या अनुभवाच्या आधारावर अमरावतीचे दिवस सुरू झाले.

---

न्या. नरेन्द्र चपळगावकर,
१३ जयनगर, दशमेशनगरजवळ,
औरंगाबाद - ४३१ ००५
दूरध्वनी : (०२४०) २३३११६६